दिनांक.०३/०६/२०२२

**पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील गुन्हे शोध पथकाची कामगीरी**
**जबरीचोरी गुन्हयातील आरोपीचा तात्काळ शोध घेवुन जप्त केले १,६०,४१९रूपयाचा मुददेमाल**

दिनांक.०१/०६/२०२२ रोजी रात्री दत्तनगर येथील अंकुर हॉस्पीटल जवळ मोटार सायकल स्वार नामे माधव अप्पाराव मोरे रा.आलेगांव ता.कंधार हा दत्तनगर रेल्वेपटरीजवळ त्याचेकडील मोटार सायकल पॅशन प्रो. रस्त्यावर उभी करून लघुशंकेकरीता उतरला असता अनोळखी दोन महिला व एक इसमांनी येवुन त्यास चाकुचा धाक दाखवुन त्याचे खिशातील नगदी ३४००/—व मोबईल किमंत १२५००/—तसेच पॅशन प्रो.मोटार सायकल किमंत ५०,०००/—असे एकुण ६५९००/—चा माल धमकी देवुन जबरीने हिसकावुन त्याचेच मोटार सायकलवर तिघे बसुन पळुन गेल्यावरून पो.स्टे शिवाजीनगर येथे गु.र.न२०८/२२ कलम ३९२,३२३,३४ भादंवि सह कलम ४/२५ शस्त्र अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल झाल्याने मा.पोलीस निरीक्षक साहेब यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हयातील संशयीत दोन महिला व इसम याची गोपनिय माहितीचे आधारे सदरील महिला व इसम नांदेड शहराबाहेर गेल्याची माहिती मिळाल्याने मौ.मालेगांव ता.अर्धापुर येथे जावुन संशयीत महिला १.सौ.गंगासागर उर्फ माया राजु माथेकर वय ३० वर्ष, २.सौ. सिमा संतोष निळकंटे वय २७ वर्ष यांना ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन गुन्हयात गेलेली पॅशन प्रो. मोटार सायकल,एक मोबाईल व नगदी ३४,००/—रूपये असा एकुण ६५९००/—रूपयाचा माल तसेच त्यांनी वेगवेगळया ठिकाणावरून चोरलेले ७ अॅन्ड्राईड मोबाईल ज्याची किमंत अंदाजे ९४,५१९/ असा एकुण १६०४१९/—रूपयाचा माल जप्त करून उत्कृष्ट कामगीरी केली.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक नांदेड, मा.श्री प्रमोद शेवाळे साहेब, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री निलेश मोरे साहेब,तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी श्री चंद्रसेन देशमुख साहेब, व पोलीस निरीक्षक पो.स्टे शिवाजीनगर श्री नितीन काशिकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील प्रमुख सपोनि रवि वाहुळे, पोउपनि मिलींद सोनकांबळे, पोहेकॉ २२८२ शेख इब्राहीम,पोना/८३५ रवि बामने, पोना/७०९ दिलीप राठोड, पोशि/३०९९ देविसिंग सिंगल, पोशि/३०११ शेख अझहर यांनी पार पाडली.

पोलीस निरीक्षक,
पो.स्टे शिवाजीनगर नांदेड